e-ISJN: A4372-3088
p-ISJN: A4372-3089

ISSN: 2394-3122 (Online)
ISSN: 2394-6253 (Print)
Impact Factor: 6.03

Volume 11, Issue 12, December 2024

SK International Journal of Multidisciplinary Research Hub
Journal for all Subjects

Research Article / Survey Paper / Case Study
Published By: SK Publisher
(www.skpublisher.com)

*A Monthly Double-Blind Peer Reviewed Refereed Open Access Multidisciplinary & Multilingual International Journal*

Special Issue: Two Day National Interdisciplinary Conference on "Script Writing"
Organised by: Department of Languages, Shankarlal Khandelwal Arts, Science & Commerce College, Akola, Maharashtra 444002.
(Sponsored by Pradhan Mantri Uchchatar Shiksha Abhiyan Grants to Strengthen Colleges)

# कथासाहित्यविषयकं योगदानम् - सौभाग्यवती पंडिता क्षमाराव रचित लघुकथा-कथामुक्तावली

**सीमा विनय भारंबे**

**DOI:** https://doi.org/10.61165/sk.publisher.script.writing.2024.47

**प्रस्तावना**

काव्य एवं त्याचा शास्त्रीय विचार संस्कृत भाषेत एक महत्त्वपूर्ण स्थान आहे. कालीदास ,भास ,भवभूती ,भारवी ,माघ इत्यादी महान कवींनी उत्तम काव्य, महाकाव्य आणि खंडकाव्य रचली आहेत. असे अनेक आचार्य होऊन गेले आहेत ज्यांनी साहित्य निर्माण केले आहे. त्याचप्रमाणे साहित्य सृजन करणारे अनेक आचार्य झाले आहेत. ज्यांचे काव्य आणि महाकाव्य ,खंडकाव्य अत्यंत महत्त्वाचे आहे आधुनिक संस्कृत साहित्याचा प्रारंभ इ.स.१८०१ पासून मानला जातो. ज्यामध्ये महाकाव्य प्रकारात लिहिलेले साहित्य सर्वात महत्त्वाचे आहे. 19व्या आणि विसाव्या शतकात संस्कृतमधील मुक्त काव्य प्रकारामध्ये विपुलता आली .सुभाषित , लघुकाव्य, दूतकाव्य , शतक काव्य इत्यादी इतर भाषांचा साहित्यांचा संपर्काबरोबरच आधुनिक संस्कृत साहित्यात अनेक नवीन मुक्तक काव्यांचा परिचय झाला जसे की गझल ,नवगीते ,लोकगीते इत्यादी पारंपारिक शैलीमध्ये ही रचनांचे सातत्य अखंड राहिले वर उल्लेखिलेल्या काव्यांचे अनेक लेखक झालेले आहेत, संस्कृत साहित्य समृद्ध केले अशा पंडिता क्षमाराव !

कथं हि न करिष्यन्ति कन्याभ्य:।

ऋणम् तत् पैतृकम् पुण्यमपाकुर्युर्तदिह ताः।।

संस्कृत लेखिका पित्याकडून मिळालेल्या प्रघाढ पांडित्याचा वारसा आणि त्याची परिपक्व प्रतिभा यांचा सुरेख मेळ त्यांनी संस्कृत साहित्याला एक नवा आयाम दिला. संस्कृत साहित्य वेदकाळापासून कथावाङ्मयाने ओतप्रोत भरलेले असले तरी लघुकथा - आधुनिक तंत्राने भरलेले' शॉर्ट स्टोरी 'या नावाने प्रसिद्ध असलेल्या कथा प्रकार संस्कृतात यशस्वीपणे हाताळणाऱ्या आणि रूढ करणाऱ्या क्षमादेवी या पहिल्याच.

© 2024, SK Publisher All Rights Reserved

क्षमा देवींचे संस्कृत ग्रंथसंपदा महाकाव्य-सत्यग्रह गीता, उत्तर सत्याग्रह गीता चरित्र काव्य -श्री तुकाराम चरितम्, श्री रामदास चरितम्, श्री ज्ञानेश्वर चरितम् , मीरा लहरी, शंकर जीवनाख्यानीयम् तसेच तीन लघुकथासंग्रह प्रसिद्ध आहेत १) ग्रामज्योती :२) कथापञ्चकम् ३) कथा मुक्तावली. कथा मुक्तावली मध्ये उत्तम 15 गद्यकथा आहे.१) प्रेमरसोद्रेक २) तापस्य पारितोषिकम् ३) परित्यक्ता ४) मिथ्याग्रहणम् ५) वृत्तशंसिच्छत्रम् ६) हैमसमाधि:७) माया जालम् ८) स्वानिकव्यामोह:९) नजमदिलेल १०) विधवोव्दाहङ्करम् ११) क्षणिकविभ्रम: १२) निशीथबलि:१३) मत्सजीवी केवलम् १४) आत्मनिर्वासनम् १५)शरद्दलम् इत्यादी. कथा मुक्ता वाली गद्यातील प्रथम रचना आहे. कथामुक्तावलीची भाषा प्रौढता, अलंकार प्राचार्य ,सुगुंफण आहे असे वाटते की पद्य रचना करता करता गद्याची रचना केली. 'गद्यकवींना निकषं वदन्ति' या उक्तीवर विचार करून त्याला अनुरूप रचना करण्याचे ठरवले असेल कथा मुक्तावलीत पंचतंत्र आदिपासून वेगळे कथा साहित्याकडे वळवण्याचा प्रयास आहे. कथा याच्या आधारे नव्या युगातील सभ्यता तसेच नवेचेतन ,ज्यात राष्ट्रांचा तात्कालीन जीवन प्रस्फुटित होते. सर्व कथांच्या केंद्रस्थानी स्त्रियाच प्रामुख्याने आहेत. सर्व कथांच्या पार्श्वभूमी अर्थातच स्वातंत्र्यपूर्व काळातील स्त्रियांच्या आयुष्यातील तात्कालीन समस्यांच्या विचार सर्व कथांमध्ये केलेला आहे. सर्वच कथांमध्ये असणारी स्त्री ही कणखर व्यक्तिमत्त्वाची आणि कुटुंब वत्सल अशी आहे. सर्व कथा तात्कालीन सामाजिक स्थितीचे यथार्थ चित्रण करणाऱ्या आहेत. क्षमादेवींना त्यांच्या प्रत्येकच कथेत बारकावे टिपत अत्यंत मनोवेधक आणि प्रभावी निसर्ग चित्रण केलेले आहेत. त्यांची भाषा प्रभुत्व आणि लघुकथा लेखनावर असणारी हुकूमत जाणवते .येथेकथा मुक्तावली यातील १) प्रेमरसोद्रेक२) तापस्य पारितोषिकम ३) मायाजालम या तीन लघु कथांद्वारे संस्कृत साहित्यातील त्यांचे योगदान प्रस्तुत करण्याचा येथे प्रयास करत आहे.

**लघुकथेची व्याख्या**

लेखक ज्या दृष्टिकोनातून लेखन करत असतो त्यालाच वाचकाच्या दृष्टीने एखाद्या लघुकथेत जेव्हा खूप महत्त्व येत असते तेव्हा ती अनेकदा निबंध व ललितबंध याच्या जवळ सरकलेली असते परंतु जोपर्यंत ती एका विशिष्ट कालखंडात किंवा एका किंवा अनेक व्यक्तींच्या संबंधात घडलेल्या घटनांचे चित्रण करीत असते तोपर्यंत तिचे कथात्व अभंगच राहते. लघुकथा म्हणजे केवळ एक प्रासंगिक चित्र व घटनाचित्र नव्हे लघुकथा म्हणजे केवळ एक चित्रही नव्हे आणि लघुकथा म्हणजे केवळ एका घटनावलीचे अनुकूल कालानुक्रमाने केलेले निवेदन ही नव्हे. लघुकथेत व्यक्तीचित्रण हे व्यक्तीचित्रणासाठी नसते तसेच प्रसंग चित्र हेही प्रसंग चित्रणासाठी नसते तर या सर्व गोष्टी एका जिवानुभावाला अर्थ देण्यासाठी अवतरत असतात म्हणूनच लघुकथा ही ज्ञान सर्वांची मिळून बनलेली एक संघटना असते एका अर्थपूर्ण सुव्यवस्था असते व ही तिचे सुसंघटित एकात्मक चैतन्यपूर्ण रूप आपणास जाणवत असते सगळेच वाङ्मय प्रकार हे सुसंघटितता व्यक्त करतात परंतु लघुकथेची सुसंघटना आपल्या डोळ्यात विशेष भरते याचे कारण हे सर्व तिला अत्यल्प अवकाशात साधावयाचे असते कथात्म साहित्य ला अत्यावश्यक ठरवणाऱ्या सर्व महत्वपूर्ण घटकांची अल्पावकाशात साधलेली अर्थपूर्ण संघटना म्हणजे लघुकथा.

आधुनिक लघुकथेला स्केच आणि कथेचे संमिश्रण म्हणून कोणी पाहत असो वा नसो आजची लघुकथा ही एक वेगळी आणि स्वायत्ते आहे तरीही ती विकसनशील शैली आहे यावर वाद नाही लघुकथा ही काल्पनिक कथांचे संक्षिप्त कार्य असते. साधारणतः १०००ते७५००० शब्दांपर्यंत कादंबऱ्या किंवा महाकाव्यांपेक्षा ज्यात शेकडोपृष्ठांवर पसरलेली गुंतागुंता ची कथा आहे. लघुकथा एकाच घटनेवर, पात्रावर किंवा

कालखंडावर केंद्रित असतात फॉर्मल अचूक भाषा आणि कथात्मक रचना आवश्यक आहे ज्यामुळे अनेकदा प्रतीकात्मकता समृद्ध कथा असतात.

लघुकथा एक घट्ट शब्द मर्यादित संपूर्ण वर्णनात्मक अनुभव देतात यामध्ये पात्रांचा ओळख करून देणे, प्लॉट सेट करणे, संघर्ष निर्माण करणे आणि निराकरण करणे हे सर्व एका संक्षिप्त जागेत समाविष्ट आहे ते क्षण कॅप्चर करतात जे वर्ण आणि माननीय स्थितीबद्दल सखोल सत्य प्रकट करतात.

**१. लघुकथा लेखनाचा उद्देश**

१) आधुनिक संस्कृत साहित्य संबंधित माहिती मिळेल.

२) पंडिता क्षमारावांचे व्यक्तिमत्त्वाचा परिचय प्राप्त करू शकतो.

३) आधुनिक संस्कृत साहित्याची प्रमुख गद्य काव्य माहिती होईल.

लघुकथा प्रकार

१) कल्पना रम्य

२)गुण

३) प्रणय

४) विज्ञान कथा

५) भाई पर.

**२. लघुकथेची वैशिष्ट्ये**

लघुकथांमध्ये रहस्य प्रणय आणि विज्ञान कथा यासारख्या विविध शैलींचा समावेश असू शकतो ते वाचकांना विविध जग विविध पात्रे आणि विविध थीम एक्सप्लोर करण्यास अनुमती देतात सर्वकाही एक कप कॉफीचा आस्वाद घेण्यासाठी लागणारा वेळेत त्याची संक्षिप्तता असूनही लघुकथा शक्तिशाली संदेश देऊ शकतात आणि चीरस्थाई छाप सोडू शकतात .

**लघुकथा घटक**

१) संक्षिप्तता

२) लक्ष केंद्रित करा

३) सुस्पष्टता

**कथा प्रेमरसोद्रेक**

यात एक पिता आपली मुलगी अस्मॉंचे मुख पाहण्यासाठी आतुर होतो कारण की त्यांनी आपल्या पत्नीचा परित्याग केला होता आणि पत्नीची प्रतिज्ञा होती की त्याला तिची मुलगी दाखवावी कारण की पत्नीला त्यांनी मूलबाळ होत नसल्यामुळे घरातून हाकलून दिले होते परंतु तेव्हा पतीला माहिती नव्हते की ती गर्भवती आहे आणि त्यामुळे तिला गर्भावस्थेत शारीरिक मानसिक आणि आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागते आणि मुलीच्या जन्मानंतर तिचा मृत्यू देखील होतो ती मरताना आपली मुलगी एका वृद्ध शेतकरी दाम्पत्याला पालन पोषण करण्याकरिता देते. चांगल्या पालन पोषण यामुळे अस्मॉंला देखील त्याच्यासोबत आत्मीयता निर्माण होते. एक दिवस तिचे वडिल अस्मॉंला घेऊन जाण्यासाठी जातात तेव्हा अस्मॉं वडलांसोबत जाण्यास नकार देते. वडील त्या वृद्ध दांपत्याला धनाचा लोभ सुद्धा देतात तरी अस्मॉं त्याच्या सोबत जात नाही आणि ते निराश होऊन निघून तिथून निघून जातात.

**मायाजालम्**

यात चार महिलांची कथा आहे ज्या आपल्या पती किंवा प्रेमीची परित्यक्ता आहे. त्या महिला जेव्हा एकत्र भेटतात तेव्हा त्या आपापल्या प्रेम अनुभवांचे वर्णन करतात. संपूर्ण कथा ही कुतूहल आणि व्यक्त आहे तथांतक वाचक रहस्य जाणतो.

**तापस्य पारितोषिकम्**

या कथेत एका जोडप्याची कथा आहे त्या उर्मिला व तिचा पती जो आजारी आहे. त्याला तपासण्यासाठी वैद्यराज आले असता उर्मिला विचारते की आर्य माझे पती कसे आहेत ते सांगा वैद्य राज म्हणतात आज त्यांच्या रोगाचा जणू उद्रेक झालाय जर काही प्रबल दैवा अनुकूल घडले तरच रात्री रोग शांत होईल पण दुर्दैव की रात्रीच काळाच्या आमंत्रण येत असते म्हणून तू अनिष्टारात तोंड येण्यासाठी तयार राहा मुली ईश्वर इच्छा बली असे हेच सत्य आहे दैव योगाने उल्लंघन करणे कोणाला शक्य शक्य झाले आहे उर्मिला वैद्य राजाच्या पाया पडून विनवणी करते वेदराज निघून जातात.

जस जशी रात्र होत होती तसतशी उर्मिलाला खूप भीती वाटू लागली व ती नशिबाला देखील कोसत होती व नंतर तपासवेष धारण केलेली शाम वर्णी का महाकाय तेजस्वी व्यक्ती निःशब्द पणे प्रवेश करते.  क्षणात रोग्याच्या पायथ्याशी तेज पुंजाप्रमाणे अवतीर्ण होते व तिथून अतिथी व उर्मिला दोघांमधील संवाद आहे. त्यात अतिथी उर्मिलेला समजून सांगतो मरत्याचे जीवन दैवाधीनच असते. दैवानुसार घडणाऱ्या घटनांबद्दल शोक पुरे कारण की पूर्वीच ठरलेली भविष्य तुम्हा दोघांच्या हितासाठीच असते. अतिथी म्हणतो प्रथम तुला उपकृत करण्यासाठी आणि साहसा पासून तुझे रक्षण करण्यासाठी मी आलो व  मला जे करायचे आहे ते तुझ्या पतीच्या आत्म्याशी संबंधित आहे देहाची नव्हे तेव्हा उर्मिला क्षणभर निःस्तब्ध होते.

**उपसंहार**

भारतीय संस्कृती संस्कृत भाषा यास याबद्दलचा मनस्वी आदरभाव अभ्यास प्रयोगशीलता उद्यमशीलता उत्कटता याचा परिचय पंडित श्रमा राव यांचे साहित्य वाचताना येतो.

इंग्लिश व इतर भाषांवर प्रभुत्व असूनही त्यांनी संस्कृत मध्ये त्यांचे साहित्य लिहिले याची कारण त्यांनी एका प्रस्तावने दिले आहे की संस्कृत भाषा हे इतर कोणत्याही भाषा इतकी किंबहुना त्याच्याहूनही अधिक कोणताही जीवना अनुभव व्यक्त करायला समर्थ भाषा आहे हे त्यांना सिद्ध करायचे होते आधी संस्कृत मध्ये लिहिलेल्या व नंतर संस्कृत मध्ये अनुवादित केलेल्या काही कथा यांची साक्ष देतात. इंग्लिश लेखनातील त्यांच्या प्रभुत्वामुळे त्यांना प्रति सरोजिनी देवी देखील म्हणत असत . संस्कृत साहित्याचा विचार करता महाराष्ट्रातच नव्हे तर भारतात त्यांच्या तोडीची एकही स्त्री लेखिका आढळत नाही. पंडिता क्षमारावांच्या आधुनिक लघुकथा ह्या चांगल्या निदर्शन सिद्ध होते. क्षमारावांचे साहित्यात लोक जीवनाच्या जवळ जाण्याची तडफड दिसते. क्षमारावांनी आधुनिक नवे शब्द निर्माण केले त्याविषयीचे विविधता आणि शैली सुद्धा शुद्ध आणि सुंदर आहे. क्षमारावांचे रचना पाहून कपिल देव द्विवेदी म्हणतात, " पंडिता क्षमारावांमध्ये भाव आहेत, सरलभाषा आहेत नैसर्गिक अलंकार आहे आणि स्त्री जनोचित कोमल हृदया चा समन्वय आहे."

### संदर्भ ग्रंथ

१) https//www anantaajournal. com

२) https://www studiobinder.com>blog

३) कथा मुक्तावली-पंडिता क्षमा राव-अनुवादिके डॉ. नंदा जयंत पुरी

:::. Cite this article .:::

भारंबे, सीमा विनय. (2024). कथासाहित्यविषयकं योगदानम् - सौभाग्यवती पंडिता क्षमाराव रचित लघुकथा-कथामुक्तावली. Two Day National Interdisciplinary Conference on Script Writing, 232–236. https://doi.org/10.61165/sk.publisher.script.writing.2024.47